# अजुनही आठवतात

## स्वाध्याय

### परिच्छेद १


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३७ वरील (ओळ १ ते ९) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[१९६० ची ही गोष्ट ......................**

**...................... झोपावेच लागत असे.]**

**अ. आकलन**

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. नापास झालो, तर लोक काय म्हणतील?

२. ज्यांनी परीक्षेसाठी चंदा करून दिला, ते काय म्हणतील?

३. नापास झाल्यावर माझं काय होईल?

**कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.**

१

↓

२

↓

**म्हणून लेखकाला न जागता झोपावेच लागत असे**

**उत्तर:** १. लहानपणापासून लोकांनी दिलेले शिळेपाके खाल्ले असल्याने लेखकाला कोणता ना कोणता आजार कायम असे.

२. आजारातील अशक्तपणाने काही खाल्ले, की लेखकाला लगेच गुंगी येई.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखक या साली मॅट्रिक झाले** →

२. **लेखकांच्या मॅट्रिकच्या परीक्षेचे केंद्र** →

**उत्तर:** १. १९६०   २. उदगीर

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. १९६० ची ही गोष्ट, _______

अ. दुष्काळ पडला तेव्हाची गोष्ट.

ब. मी अमेरिकेला गेलो तेव्हाची ही गोष्ट.

क. मी शिकायला उदगीरला गेलो तेव्हाची गोष्ट.

ड. मॅट्रिक झाल्यासालची ही गोष्ट..

२. सारेजण थोडेफार जागायचे; ______

अ. पण मला जागणे जमायचे नाही.

ब. पण मी मात्र खूप जागायचो.

क. मीही त्यांच्याबरोबर जागायचो.

ड. पण मला जागायला आवडायचे नाही.

उत्तर: १. १९६० ची ही गोष्ट, **मॅट्रिक झाल्यासालची ही गोष्ट.**

२. सारेजण थोडेफार जागायचे; **पण मला जागणे जमायचे नाही.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखक १९६० साली मॅट्रिक झाले.

२. लेखकाचे मॅट्रिकचे केंद्र अहमदपूरला होते.

३. लहानपणापासूनच लेखक फारच सशक्त व मजबूत होते.

४. लेखक अभ्यासासाठी रात्रभर जागायचे.

**उत्तर:** १. सत्य २. असत्य

३. असत्य ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'कमजोर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'चंदा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. शिळे अन्न खाल्ल्यामुळे लेखकाचे शरीर कसे झाले होते?

२. लेखकाच्या परीक्षेसाठी सर्वांनी काय जमा केला होता?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. [ ] : वर्गणी : : रोग : आजार

२. [ ] : ताजं : : जागणे : झोपणे

**उत्तर:** १. चंदा २. शिळं

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. परीक्षा, नापास, चंदा, पेपर

२. रोग, कमजोर, गुंगी, जेवण

**उत्तर:** १. चंदा २. जेवण

**कृ.३. खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखून त्याचा अर्थ लिहा.**

आपल्याला आइस्क्रीम खाताना आई पाहील, या विचाराने ध्रुवच्या मनात सारखे धुकूडपुकूड होत होते.

**उत्तर:** धुकूडपुकूड होणे - धाकधूक वाटणे.

**कृ.४. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. कम [ ] दार

२. भारा [ ] दुपारी

**उत्तर:** १. कमजोर, जोरदार

२. भाराभर, भरदुपारी

**कृ.५. खालील ग्रामीण भाषेतील शब्दांचे अर्थ लिहा.**

१. चंदा २. धुकूडपुकूड

३. शिळंपाळं ४. हमेशाकरिता

५. सुरसुर ६. गेल्याले

**उत्तर:** १. वर्गणी २. धडपड

३. शिळे अन्न ४. नेहमीसाठी

५. सरसरत ६. गेलेले

**कृ.६. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

पिंट्याच्या घरची परिस्थिती गरीब असल्याने ________ .

**उत्तर:** १. पिंट्याच्या घरची परिस्थिती गरीब असल्याने **त्याला शालेय शिक्षण पूर्ण करता आले नाही.**

२. पिंट्याच्या घरची परिस्थिती गरीब असल्याने **त्याला वर्गातील इतर मुलांसारखी मौजमजा करणे परवडत नसे.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील सर्वनाम व विशेषण शोधून लिहा.**

त्यामुळे मी सारखा कमजोर असायचो.

**उत्तर:** सर्वनाम - मी

विशेषण - कमजोर

कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | खोलीत | | | |
| २. | साऱ्यांनी | | | |
| ३. | अहमदपूरला | | | |
| ४. | सालची | | | |

उत्तर:

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | खोलीत | खोली | त | सप्तमी |
| २. | साऱ्यांनी | साऱ्यां | नी | तृतीया |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | अहमदपूरला | अहमदपूर | ला | द्वितीया / चतुर्थी |
| ४. | सालची | साल | ची | षष्ठी |

**कृ.३. खालील वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

'ज्यांनी परीक्षेसाठी खास चंदा करून दिला, ते काय म्हणतील व नापास झाल्यावर माझं काय होईल, हे नि असे अनेक भाराभर प्रश्न माझ्या मनात सारखे येऊन जात.'

**उत्तर:** परीक्षेसाठी - शब्दयोगी अव्यय

खास - क्रियाविशेषण अव्यय

व - उभयान्वयी अव्यय

झाल्यावर - शब्दयोगी अव्यय

**कृ.४. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. एक एक पेपर संपू लागला. **(अपूर्ण वर्तमानकाळ करा.)**

**उत्तर:** एक एक पेपर संपू लागला आहे.

२. पण मला जागणे जमायचे नाही.

**(साधा भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** पण मला जागणे जमणार नाही.

**कृ.५. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. ताप्तुरता / ताप्तूरता / तातपुरता / तात्पुरता

२. धुकूडपुकूड / धूकुडपूकुड / धूकूडपूकूड / धुकुडपुकुड

**उत्तर:** १. तात्पुरता २. धुकूडपुकूड

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

१९६० ची ही गोष्ट मॅट्रिक झाल्यासालची ही गोष्ट

**उत्तर:** १९६० ची ही गोष्ट, मॅट्रिक झाल्यासालची ही गोष्ट.

**ड. माझे मत**

**कृ.१. परीक्षेच्या आधी तुमच्या मनात कोणत्या विचारांचा कल्लोळ निर्माण होतो?**

**उत्तर:** परीक्षेच्या आधी अभ्यासाचा ताण तर असतोच; पण मनावर खूप दडपण असतं. आपला अभ्यास नीट झाला आहे का? तेवढा अभ्यास पुरेसा आहे का? केलेला अभ्यास परीक्षेत नीट आठवेल ना? पेपर फार कठीण तर येणार नाही ना? आपल्याला चांगले गुण मिळतील ना? गुण कमी मिळाले किंवा नापास झालो, तर आईबाबा ओरडतील का? मित्रमैत्रिणी काय म्हणतील? शिक्षकांना काय सांगायचं? या आणि अशा असंख्य प्रश्नांचा, विचारांचा कल्लोळ परीक्षेआधी मनात निर्माण होतो; पण यामुळे आपले मन विचलित होऊ न देता, मी अभ्यासावर लक्ष केंद्रित करते.

## परिच्छेद २

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३७ वरील (ओळ १० ते १८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|झाले सारे पेपर्स ......................

...................... आईवडील नसल्यामुळे.|

अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

(१) ← **परीक्षा संपल्यावर लेखकाने उदगीरमध्ये हे पाहिले** → (२)

**उत्तर:** १. कापसाच्या गिरण्या २. जुना किल्ला

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**

**अहमदपूरच्या बोर्डिंगमधून आल्यावर**

| **लेखक येथे गेला** | **कारण** |
|---|---|
| १ | २ |

**उत्तर:** १. बहिणीच्या गावी

२. लेखकाला आईवडील नव्हते

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **पेपर्स हातातून गेल्यावर लेखकाच्या हातात फक्त एवढेच उरले** → [ ]

२. **लेखकाचे गाव या तालुक्यात होते** → [ ]

**उत्तर:** १. निकालाची वाट पाहणे. २. उदगीर

**क्र.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. झाले सारे पेपर्स. ________

अ. संपले सगळे.

ब. आता पुढचे वर्ष सुरू.

क. आता निकालाची वाट पाहायची.

ड. संपली परीक्षाच सारी.

२. अनेक मुलं आपापल्या आईवडिलांच्या गावी गेले, ______

अ. तसाच गेलो मी बहिणीच्या गावी.

ब. तसाच गेलो मीही आईवडिलांच्या गावी.

क. तसाच गेलो मी आजोळी.

ड. तसाच गेलो मी घरी.

उत्तर: १. झाले सारे पेपर्स. **संपली परीक्षाच सारी.**

२. अनेक मुलं आपापल्या आईवडिलांच्या गावी गेले, **तसाच गेलो मी बहिणीच्या गावी.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. परीक्षा संपल्यावर लेखक उदगीर गाव, पाहून आले.

२. लेखकाचे बोर्डिंग अहमदपूरला होते.

३. लेखकाचे आईवडील नव्हते.

४. बोर्डिंगातले सामान परत करून लेखक भावाच्या गावी गेला.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'अहमदपूर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'कापूस' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. उदगीर कोणत्या गावापेक्षा मोठं गाव होतं?

२. लेखकाने उदगीरमधील कशाच्या गिरण्या पाहिल्या?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. ग्रामीण भाषेतील खालील शब्दांचे प्रमाण भाषेतील अर्थ लिहा.**

१. पल्याड : [ ]

२. तान : [ ]

३. वापस : [ ]

४. आंथरुन : [ ]

**उत्तर:** १. पलीकडे  २. ताण

३. परत  ४. अंथरूण

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. अगोदर × [ ]  २. थोडा × [ ]

३. जुना × [ ]  ४. दूर × [ ]

**उत्तर:** १. नंतर  २. फार

३. नवा  ४. जवळ


**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. तांब्या, चमचा, ताट, भिंत

२. गाव, शहर, भार, तालुका


**उत्तर:** १. भिंत  २. भार

**कृ.४. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




**उत्तर:** अहम, अमर, मद, ,मर, दम, दर, पूर

कृ.५. **खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**




**उत्तर:** नाल

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. **खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, क्रियापद व विशेषण यांमध्ये वर्गीकरण करा.**

(पहिला, मन, मोठं, विचार, गाठले, ते)

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| मन, विचार | ते | मोठं | पहिला, गाठले |

कृ.२. **खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | निकालाची | अ. | प्रथमा |
| २. | निमित्ताने | ब. | षष्ठी |
| ३. | परीक्षा | क. | तृतीया |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.३. खालील अव्ययांची प्रत्येकी सहा उदाहरणे परिच्छेदातून शोधून लिहा.**

१. क्रियाविशेषण अव्यय  २. शब्दयोगी अव्यय

**उत्तर:** १. **क्रियाविशेषण अव्यय** : आता, अगोदर, पहिल्यांदा, पुन्हा, सारे, दूर

२. **शब्दयोगी अव्यय** : मुळे, पल्याड, बरोबर, पासून, कडे, पेक्षा

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

निकालाची वाट पाहण्यापलीकडे माझ्याकडे काहीच नव्हते. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** निकालाची वाट पाहण्यापलीकडे माझ्याकडे काय होते?

**कृ.५. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. नीमीत  २. बहीणिच्या

३. परिक्षा  ४. वडिल

**उत्तर:** १. निमित्त  २. बहिणीच्या

३. परीक्षा  ४. वडील

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

अहमदपूर गाठले व बोर्डिंगातले तांब्या ताट आंथरुन पांघरुन जे दिले असेल ते वापस करून बहिणीच्या गावी गेलो

**उत्तर:** अहमदपूर गाठले व बोर्डिंगातले तांब्या, ताट, आंथरुन, पांघरुन जे दिले असेल ते वापस करून बहिणीच्या गावी गेलो.

**ड. माझे मत**

**कृ.१. एखादे शहर, गाव, त्यातील ठिकाणं पहिल्यांदा पाहण्याचा अनुभव कथन करा.**

**उत्तर:** एका उन्हाळी सुट्टीत अलिबागच्या मावशीकडे राहण्याचा योग आला. त्यामुळे अलिबाग हे शहर मला पाहता आलं. अतिशय शांत, सुंदर अशा या अलिबागचे वैशिष्ट्य म्हणजे विस्तीर्ण समुद्रकिनारे. याशिवाय मुरूड-जंजिरा, जलदुर्ग, उंदेरी किल्ला, कोरलाई किल्ला यांसारखे गडकिल्ले, तर कणकेश्वराचे प्रसिद्ध मंदिर मी पाहिले. चहुबाजूस नारळाची झाडे, सोनेरी वाळू आणि त्यात डौलाने उभ्या या वास्तू कायमच्या मनावर कोरल्या गेल्या. रात्रीच्या वेळी समुद्रकिनाऱ्यावर शांत बसून समुद्राची गाज ऐकण्याचा अनुभव तर अविस्मरणीयच म्हणावा लागेल. शहरांमध्ये सहसा न अनुभवता येणारी शांतता मला या लहानशा शहरात अनुभवता आली. ऐतिहासिक वारसा जोपासणारं हे अलिबाग मला फार आवडलं.


## परिच्छेद ३

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३७-३८ वरील (ओळ १९ ते २८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**|आलो एकदाचा परीक्षेचा ......................**
**...................... काही इलाजच नव्हता.|**

### अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. दसकटा पळाट्याला जा.

२. इकडून पानं घेऊन ये.

३. तिकडून लाकडं घेऊन ये.

४. कधी या पाटलीणबाईकडे, कधी त्या पाटलीणबाईकडे टाक.


कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. मॅट्रिकची परीक्षा देऊन तोऱ्यात खात-पीत असतील.

२. रोज काम करावे लागे व कुणाहीसमोर याचना करावी लागे.


कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. शाळेतील इतर पोरं खेळत असत.

२. त्यातील काही लेखकाला चिडवत.


कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. मॅट्रिकची परीक्षा देऊन तोऱ्यात खात-पीत असतील.

२. रोज काम करावे लागे व कुणाहीसमोर याचना करावी लागे.

कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. शाळेतील इतर पोरं खेळत असत.

२. त्यातील काही लेखकाला चिडवत.

**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**

१ ← **लेखकाच्या बहिणीला फक्त याच गोष्टी कळत होत्या.** → २

↓

३

**उत्तर:** १. काम २. कष्ट

३. पोट भरणे

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**

१. **बहिणीकडे आल्यावर लेखकाला झालेला ताण** → ☐

२. **लेखकाने व त्याच्या वर्गातील मित्रांनी दिलेली परीक्षा** → ☐

**उत्तर:** १. रोजच्या जगण्याचा २. मॅट्रिकची

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. परीक्षा तेही मॅट्रिकची दिली; ________

अ. परंतु तिला त्याचं कौतुक नव्हतं.

ब. परंतु तिचं सुरू झालं बूरबूर..

क. परंतु तिला आनंद झाला नाही.

ड. परंतु ती खुशीत नव्हती.

२. तिच्या म्हणण्याप्रमाणे मी करतासे, ________

अ. कारण ती मोठी होती.

ब. कारण ती हुशार होती.

क. कारण मला जगायचे होते.

ड. कारण मला काम करायला आवडायचे.

**उत्तर:** १. परीक्षा तेही मॅट्रिकची दिली; **परंतु तिचं सुरू झालं बूरबूर.**

२. तिच्या म्हणण्याप्रमाणे मी करतासे, **कारण मला जगायचे होते.**

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाचे रोजचे जगणे मोठ्या सुखाचे होते.

२. बहिणीने सांगितलेले लेखक ऐकत असे, कारण लेखकाला जगायचे होते.

३. लेखकाला रोज कोणते ना कोणते काम करावेच लागे.

४. लेखकाला स्वत: पास-नापास होण्याची चिंता नव्हती.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.८. प्रश्न तयार करा.**

१. 'बहीण' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'चेहरा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लेखक परीक्षेचा ताण कमी केल्यावर कोणाकडे आला?

२. मनातील भावना बऱ्याचदा कोठे उमटतात?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | पान : | | २. | बहीण : | |
| ३. | चेहरा : | | ४. | खेळ : | |
| ५. | पोट : | | ६. | तोरा : | |
| ७. | तमा : | | ८. | इलाज : | |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पर्ण | २. | भगिनी |
| ३. | मुख | ४. | क्रीडा |
| ५. | उदर | ६. | मोठेपणा |
| ७. | पर्वा | ८. | उपाय |

**कृ.२. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**


१. **तमा नसणे** : पर्वा नसणे.

**वाक्य:** कर्तृत्वावर विश्वास असणाऱ्यांना नशिबाची **तमा नसते.**

२. **तोंड वेंगाडणे** : याचना करणे.


**वाक्य:** पादचारी पुलावर अतिशय वृद्ध लोकांना भिकेसाठी **तोंड वेंगाडताना** पाहून त्यांची खूप दया येते.

**कृ.३. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




**उत्तर:** माय, पाट, पान, पाय, लीन, नट, मान

कृ.४. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.




उत्तर: मेळ

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.**

(परीक्षा, ते, तान, दिली, राहायचे)

उत्तर:

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| परीक्षा, तान | ते | - | दिली, राहायचे |

**कृ.२. खालील शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप शोधून लिहा.**

१. बहीण  २. घर

३. वाडा  ४. मॅट्रिक

उत्तर: १. बहिणी  २. घर

३. वाड्या  ४. मॅट्रिक

**कृ.३. वाक्यांतील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

१. तिच्या म्हणण्याप्रमाणेच मी करतासे, कारण मला जगायचे होते.

**उत्तर:** कारण – उभयान्वयी अव्यय

२. आलो एकदाचा परीक्षेचा तान जरासा खाली करून बहिणीच्याकडे, तर झाला दुसरा तान इकडे रोजच्या जगण्याचा.

**उत्तर:** जरासा, इकडे – क्रियाविशेषण अव्यय

बहिणीच्याकडे – शब्दयोगी अव्यय

तर – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. पण याशिवाय काही इलाजच नव्हता.

**(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** १. पण याशिवाय काही इलाज कुठे होता?

२. तिला बिचारीला काम, कष्ट व पोट भरणे याशिवाय काय कळणार? **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** तिला बिचारीला काम, कष्ट व पोट भरणे एवढेच कळत असे.

**कृ.५. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. बीचारिला २. तीकडुन

**उत्तर:** १. बिचारीला २. तिकडून

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

तिच्या म्हणण्याप्रमाणेच मी करतासे कारण मला जगायचे होते

**उत्तर:** तिच्या म्हणण्याप्रमाणेच मी करतासे, कारण मला जगायचे होते.

**ड. माझे मत**

**कृ.१. दैनंदिन जीवनात तुम्ही कोणती कामे करून घरकामास हातभार लावता?**

**उत्तर:** सध्याचे युग हे अतिशय धावपळीचे युग आहे. माझा दिवसाचा बराचसा भाग शाळा आणि अभ्यास यात जातो. पण माझे आई-बाबाही सतत कामासाठी धावपळ करताना मला दिसतात. घर आणि ऑफिस यांचा तोल सांभाळणे म्हणजे तारेवरची कसरतच. म्हणूनच आईला मदत करणे मला खूप महत्त्वाचे वाटते.


शाळा आणि अभ्यास सांभाळून घरी जितका वेळ असतो, त्या वेळेत मी घरातली छोटी-मोठी कामं करण्याचा प्रयत्न करतो. केर काढणे, उश्यांना अभ्रे घालणे, भाज्या कापून-चिरून देणे, पाणी भरणे, बाजारातून वस्तू आणून देणे अशी कामे मी आवर्जून करतो. रविवारच्या दिवशी तर आईला चहासुद्धा करून देतो. माझ्या धाकट्या बहिणीकडेही लक्ष ठेवतो. त्यामुळे आईच्या कामाचा भार थोडा तरी हलका होतो. तसेच मलाही कामांची सवय होते.

## परिच्छेद ४

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३८ वरील
(ओळ २९ ते ४०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.
[हे सारं परीक्षा ......................
...................... तयारी (मनाची) झाली.]

अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. बहिणीच्या गावी पेपर येत नव्हता.
२. तारीख अगोदर जाहीर होत नसे.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**

(१) → **लेखक परीक्षेत पास झाल्यावर आलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया** → (२)

**उत्तर:** १. सर्वांना आनंद झाला.

२. कुणाचाही जळफळाट नाही झाला.

**कृ.३. परिच्छेदाच्या आधारे खालील वाक्ये क्रमवार लिहा.**

१. सगळ्या गावभर फिरलो.

२. झाला चंदा गोळा.

३. काहींनी गावात चंदा गोळा करण्याचे ठरविले.

४. कॉलेजला येण्याची तयारी (मनाची) झाली.

**उत्तर:** १. काहींनी गावात चंदा गोळा करण्याचे ठरविले.

२. सगळ्या गावभर फिरलो.

३. झाला चंदा गोळा.

४. कॉलेजला येण्याची तयारी (मनाची) झाली.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखकाचा मॅट्रिकचा निकाल** → [ ]

२. **लेखकाने गावात यासाठी चंदा गोळा केला** → [ ]

**उत्तर:** १. सेकंड क्लासमध्ये पास

२. कॉलेजमध्ये जाण्यासाठी

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. मग सारखा ध्यास लागला, ________

अ. की आता कुठल्या कॉलेजला जावे.

ब. की आता कुठे नोकरी करावी.

क. की आता काय करावे पुढे म्हणून.

ड. की आता कुठली शाखा घ्यावी.

२. मीही मनांत खूप विचार करीत होतो; ________

अ. पण विचार बाहेर येत नव्हता.

ब. पण काही समजत नव्हते.

क. पण उपाय सापडत नव्हता.

ड. पण मार्ग सापडत नव्हता.

**उत्तर:** १. मग सारखा ध्यास लागला, **की आता काय करावे पुढे म्हणून.**

२. मीही मनांत खूप विचार करीत होतो; **पण विचार बाहेर येत नव्हता.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखक मॅट्रिकला सेकंड क्लास मिळवून उत्तीर्ण झाले.

२. लेखक स्वशिक्षणासाठी चंदा गोळा करत असत.

३. लेखकाची दुसऱ्या गावी येऊन मॅट्रिक बोर्डाची परीक्षा देण्याची दुसरी वेळ होती.

४. लेखक कॉलेजला जाण्यास तयार नव्हते.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. असत्य ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'मॅट्रिक' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'कॉलेज' हे ठत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लेखकाने कोणत्या बोर्डाची परीक्षा दिली होती?

२. चंदा गोळा झाल्यावर लेखकाने कोठे जाण्याची मनाची तयारी केली?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. [ ] : निशा : : जाहीर : घोषित

२. उशीर : लवकर : : [ ] : वाईट

**उत्तर:** १. रात्र २. बरे

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. निकाल, बोर्ड, परीक्षा, चंदा

२. खेडे, कॉलेज, पाडे, गाव,

**उत्तर:** १. चंदा २. कॉलेज

**कृ.३. कंसात दिलेले वाक्प्रचार खाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(जळफळाट होणे, मनाची तयारी करणे)

१. शेजाऱ्यांची प्रगती होताना पाहून श्यामरावांना मत्सर वाटत असे.

२. उपांत्य फेरीत निवड झाल्यावर सतीशने अंतिम फेरीत जिंकण्याचा मनात निश्चय केला.

**उत्तर:** १. शेजाऱ्यांची प्रगती होताना पाहून श्यामरावांचा **जळफळाट होत असे.**

२. उपांत्य फेरीत निवड झाल्यावर सतीशने अंतिम फेरीत जिंकण्यासाठी **मनाची तयारी केली.**

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. ध्यास : [ ] [ ]

२. विचार : [ ] [ ]

**उत्तर:** १. ध्यासपर्व, ध्यासपूर्ती

२. विचारसौंदर्य, विचारपूर्ण

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वांना | | | |
| २. | निकालाची | | | |
| ३. | मनात | | | |

उत्तर:

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वांना | सर्वां | ना | द्वितीया / चतुर्थी |
| २. | निकालाची | निकाला | ची | षष्ठी |
| ३. | मनात | मना | त | सप्तमी |

**कृ.२. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

मीही मनात खूप विचार करीत होतो; पण विचार बाहेर येत नव्हता.

**उत्तर:** खूप, बाहेर - क्रियाविशेषण अव्यय

पण - उभयान्वयी अव्यय

**कृ.३. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्याचे रूपांतर करा.**

लोकांना आनंद झाला. **(उद्गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती आनंद झाला लोकांना!

**कृ.४. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. (बऱ्यापेकी) (बऱ्यापैकी) (बऱ्यपैकि) (बग्रापैकी)

२. [साग्रांना] [सांऱ्याना] [साऱ्यांना] [सऱ्यानां]

**उत्तर:** १. बऱ्यापैकी २. साऱ्यांना

**ड. माझे मत**

**कृ.१. दहावीनंतर कोणते शिक्षण घेण्याचे तुम्ही ठरवले आहे?**

**उत्तर:** दहावीनंतर मी कला शाखेत प्रवेश घेण्याचे ठरविले आहे. मुळात इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, भाषा हे विषय माझ्या आवडीचे आहेत. माझा कल या विषयांकडे अधिक असल्याने, या विषयांचे सखोल ज्ञान घेण्याची माझी इच्छा आहे. पुढील शिक्षण याच विषयांत घेण्याचे मी ठरविले आहे. शिवाय कला

शाखेतून अनेक व्यवसाय क्षेत्रांचा मार्ग खुला होतो. त्यामुळेही मला कला शाखेतून शिक्षण घ्यायचे आहे. कला शाखेसाठी लोकप्रिय असलेल्या महाविद्यालयांची यादी मी तयार केली आहे.

## परिच्छेद ५


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३८ वरील (ओळ ४० ते ५०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

|दोन-चार दिवसांत ......................

...................... लक्ष कशासाठी जाणार.|

अ. आकलन


कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. कामात गुंतल्याने त्याने कधी विचारच केला नाही.

२. पाय फक्त रात्री दुखत व सकाळी रोजची कामे सुरू होत.


कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. काळेच काळे वण.

२. काही गाठी धरलेले तर काही गाठी नसलेले.


**कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.**




उत्तर: १. दोन्ही पायांत मिळून ५१ काटे काढले.

२. काटे काढताना काही जखमांतून रक्त आले, तर काही खड्डे पडले.


**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. मॅट्रिक होईपर्यंत लेखकाने चप्पल / जोडे पाहिलेही नव्हते.

२. कधी काटा बोचला, तर ते दुर्लक्ष करत.

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**




उत्तर: १. औरंगाबाद

२. दोन्ही पाय स्वच्छ धुण्याचा

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. पाय स्वच्छ धुतल्यावर पाहतो, तर काय ________

अ. जिकडे तिकडे काळेच काळे वण.

ब. जिकडे तिकडे डाग पडलेले.

क. जिकडे तिकडे जखमा होत्या.

ड. पाय सुंदर दिसत होते.

२. इतके दिवस मात्र ________

अ. सारा वेळच रिकामा होता.

ब. सारा सरावच पडला होता.

क. खूप सवय झाली होती.

ड. त्याची पर्वा वाटली नव्हती.

**उत्तर:** १. पाय स्वच्छ धुतल्यावर पाहतो, तर काय **जिकडे तिकडे काळेच काळे वण.**

२. इतके दिवस मात्र **सारा सरावच पडला होता.**

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाच्या दोन्ही पायांत मिळून ५१ काटे निघाले.

२. लेखकाने मॅट्रिक पास होईपर्यंत नवनव्या चपला व जोडे वापरले होते.

३. दोन-चार दिवसांतच लेखक कॉलेजसाठी औरंगाबादमार्गे अहमदपूरला निघणार होते.

४. लेखकाच्या पायावर काळे वण पडले होते.

**उत्तर:** १. सत्य

२. असत्य

३. असत्य

४. सत्य

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| जखम | एरवी | व्रण | वहाण | टोचणे |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |

**उत्तर:** १. जिभाळ   २. येरवी
३. वण   ४. चप्पल
५. बोचणे

**कृ.२. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. **जिभाळ लागणे** : खोल जखम होणे.

**वाक्य:** शहाळे कापताना येसूबाईच्या हाताला कोयत्यामुळे **जिभाळ लागले.**

२. **माहेर बनणे** : वास्तव्य असणे.

**वाक्य:** मी पाळलेला ससा कायम शेजाऱ्यांच्या बागेतच खेळताना सापडायचा; जणू त्यांची बाग त्याचे **माहेरच बनले होते.**

**कृ.३. खाली दिलेल्या शब्दापासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

चार : [ ] [ ]

**उत्तर:** चारचौघी, चारीठाव

**कृ.४. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

तळ [ ] वाट

**उत्तर:** तळपाय, पायवाट

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

कृ.१. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबादला | | |
| २. | दिवसांत | | |
| ३. | काट्यांचे | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबादला | ला | द्वितीया/चतुर्थी |
| २. | दिवसांत | त | सप्तमी |
| ३. | काट्यांचे | चे | षष्ठी |

**कृ.२. खालील शब्दयोगी अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. मुळे

**वाक्य:** गुरुत्वाकर्षण बला**मुळे** वर फेकलेली वस्तू खाली येते.

२. साठी

**वाक्य:** मुलांच्या शिक्षणा**साठी** आईवडील अपार मेहनत घेतात.

**कृ.३. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. दोन्ही पाय स्वच्छ धुवून काढले.

**(साधा वर्तमानकाळ करा.)**

**उत्तर:** दोन्ही पाय स्वच्छ धुवून काढतो.

२. शेवटी ५१ काट्यांचे माहेर माझे पाय बनले होते.

**(साधा भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** शेवटी ५१ काट्यांचे माहेर माझे पाय बनतील.

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्याचे रूपांतर करा.**

इतके दिवस मात्र सारा सरावच पडला होता.

**(उद्‌गारवाचक करा.)**

**उत्तर:** किती सराव पडला होता इतके दिवस!

**कृ.५. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

मी मॅट्रिक पास होईपर्यंत चप्पल किंवा जोडा म्हणायची वस्तू पाहिलीच नाही.

**उत्तर:** मी मॅट्रिक पास होईपर्यंत **चपला** किंवा **जोडे म्हणायच्या** वस्तू **पाहिल्याच नाहीत**.

**कृ.६. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कूरूप | २. | गूंतल्यामूळे |
| ३. | घासुनपूसुन | ४. | अहमदपुरमागे |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुरूप | २. | गुंतल्यामुळे |
| ३. | घासूनपुसून | ४. | अहमदपूरमार्गे |

**कृ.७. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

याचा अर्थ हाच की मी मॅट्रिक पास होईपर्यंत चप्पल किंवा जोडा म्हणायची वस्तू पाहिलीच नाही

**उत्तर:** याचा अर्थ हाच, की मी मॅट्रिक पास होईपर्यंत चप्पल किंवा जोडा म्हणायची वस्तू पाहिलीच नाही.

ड. माझे मत

**कृ.१. अशी कोणती वस्तू होती, जी मिळण्याआधी तुम्हाला त्रास सहन करावा लागला?**

**उत्तर:** साधारणपणे मी आईवडिलांकडे एखादी वस्तू मागितली, की ते कशासाठी हवी ते विचारून ती वस्तू मला देतात; पण एकदा मात्र आईकडे मी शाळेसाठी नवीन दप्तर मागितले आणि तिने अट घातली, की आधी सहामाही परीक्षेत अपेक्षित गुण मिळव, तोवर जुने दप्तर जमेल तसे वापर. सुरुवातीला फार कठीण वाटले नाही; पण काही दिवसांनी जुन्या दप्तराची शिलाई उसवू लागली. चेन तुटली. पुस्तकं बाहेर पडू लागली. शेवटी मला कापडाच्या पिशवीतून पुस्तकं न्यावी लागली; पण त्यामुळे मला जाणीव झाली, ती गरीब विद्यार्थ्यांच्या परिस्थितीची. जरा चेन खराब झाली, तर नवीन दप्तर घेणारे दप्तराचं खरं मोल नाही ओळखू शकत. परीक्षेत अपेक्षित गुण मिळाले आणि आईने नवीन दप्तर दिलं. त्या दिवशी ते दप्तर मला फार अमूल्य वाटलं!

## परिच्छेद ६


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३८-३९ वरील (ओळ ५१ ते ६२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

।मी पहिली चप्पल ......................

...................... अजूनही जखमा झाल्यामुळे.।

अ. आकलन


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. महाविद्यालयात सर्वजण फार थाटात येत.

२. मित्रांनी निभावण्यापुरती चप्पल घेण्यास सांगितले.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. चप्पल उंच असते.

२. आतापर्यंत लेखकाला अनवाणी चालायची सवय होती.

**कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.**





**उत्तर:** १. चप्पल सपाट होती व त्यात मसुरी खिळे ठोकले होते.

२. लेखकाला चालताना चपलेतले खिळे टोचायचे.

३. काट्यांमुळे पायाला झालेल्या जखमा खिळ्यांमुळे दुखावायच्या.

**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. दोन पायांतील मिळून ५१ काटे

२. पहिल्या चपलेतले काट्यांपेक्षा ताठ मसुरी मोळे

## कृ.५. चौकट पूर्ण करा.

१. लेखकाच्या महाविद्यालयाचे नाव → ☐

२. लेखकाच्या चपलेची किंमत → ☐

३. लेखकाच्या चपलेतील मोळ्यांचा प्रकार → ☐

**उत्तर:** १. मिलिंद महाविद्यालय

२. दोन रुपये

३. मसुरी

## कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. मी पहिली चप्पल पाहिली ________

अ. ती शाळेत असताना.

ब. ती नोकरी मिळाल्यावर.

क. ती फक्त औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर.

ड. ती मित्रांनी पैसे दिल्यावर.

२. काय चुकते त्या चपलेचे, ________

अ. तिला बनवणाऱ्याचे व घालणाऱ्याचेही.

ब. तिला सजवणाऱ्याचे व घालणाऱ्याचेही.

क. तिला तयार करणाऱ्याचे व तिला वापरणाऱ्याचेही.

ड. तिला तयार करणाऱ्याचे व तिला लेवणाऱ्याचेही.

**उत्तर:** १. मी पहिली चप्पल पाहिली, **ती फक्त औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर.**

२. काय चुकते त्या चपलेचे, **तिला तयार करणाऱ्याचे व तिला लेवणाऱ्याचेही.**

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाने औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतला.

२. लेखकाला अनवाणी चालण्याची सवय होती.

३. लेखकाची पहिली चप्पल दोन रुपयांची होती.

४. लेखकाची पहिली चप्पल मऊशार कापसाची होती.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.८. प्रश्न तयार करा.**

१. 'चप्पल' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'मोळे' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर लेखकाने कोणती वस्तू पहिल्यांदाच वापरली?

२. चपलेतील काय रुतते म्हणून लेखक कॉलेजला अनवाणी जाई?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. चप्पल : जोडे : : खिळे : ____

२. उंच : सखल : ____ : पातळ

**उत्तर:** १. मोळे २. जाड

**कृ.२. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| थाटात | उत्सुकता | ऐट | खिळे | टोचणे |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |

**उत्तर:** १. लेबाशात २. कुतूहल

३. टैल ४. मोळे

५. रुतणे

**कृ.३. खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

टैलत चालणे :

अ. टेहळणी करणे.


ब. सतत चालणे.

क. टाचा घासत चालणे.

ड. ऐटीत चालणे.

**उत्तर:** ऐटीत चालणे.

कृ.४. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.




उत्तर: महा, विद्या, लय, विद्यालय, महाल, मल, मय, हाल, हाय, विलय, यम

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील चौकटीत विशेषणे व विशेष्यांची सरमिसळ झाली आहे. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | | | |
|---|---|---|---|
| मसुरी | चप्पल | खपट | जोड |
| दोन | रुपये | पहिली | मोळे |

उत्तर: १. मसुरी मोळे    २. जाड खपट
३. दोन रुपये    ४. पहिली चप्पल

**कृ.२. खालील शब्दांचे उताऱ्यातील सामान्यरूप शोधून लिहा.**

१. मसूर    २. महाविद्यालय
३. मन    ४. रुपये

उत्तर: १. मसुरी    २. महाविद्यालया
३. मना    ४. रुपयां

**कृ.३. खालील वाक्यातील अधोरेखित अव्ययाचा प्रकार ओळखा.**

'काही दिवस खूप कुतूहल व नवल वाटत राहिलं.'

**उत्तर:** व - उभयान्वयी अव्यय

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्याचे रूपांतर करा.**

चप्पल घेतल्यावर थोडंसं वेगळं चालणं झालं.

**(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** चप्पल घेतल्यावर चालणं नेहमीसारखं राहिलं नाही.

**कृ.५. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

सारेच मोठे लेबाशात पाहुन मीत्रांनि घे कशितरि कपटाफिफटाची नीभावण्यापूरति म्हटल्यावर.

**उत्तर:** सारेच मोठे लेबाशात **पाहून मित्रांनी** घे **कशीतरी** कपटाफिफटाची **निभावण्यापुरती** म्हटल्यावर.

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

काय चुकते त्या चपलेचे तिला तयार करणाऱ्याचे व तिला लेवणाऱ्याचेही

**उत्तर:** काय चुकते त्या चपलेचे, तिला तयार करणाऱ्याचे व तिला लेवणाऱ्याचेही.

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्ही फार आवडीने घेतलेल्या वस्तूने / गोष्टीने तुमचा भ्रमनिरास केला असा प्रसंग लिहा.**

**उत्तर:** मला चित्रकलेची फार आवड आहे. त्यामुळे रंग ही माझ्या जिव्हाळ्याची वस्तू. एकदा एका वस्तू प्रदर्शनात मला २०० पोस्टर कलर्सचा संच दिसला. फार आवडीने मी तो खरेदी करून घरी आणला. प्रत्येक रंगाच्या ४-५ छटा असलेला तो संच माझ्या चित्रांमध्ये रंग भरणार होता; त्यामुळे कधी एकदा त्या रंगांनी चित्र रंगवते असं मला झालं. प्रत्यक्षात मात्र जेव्हा ब्रशने चित्र रंगवायला घेतले, तेव्हा रंगच उमटेनात. अगदी फिका रंग पाहून माझा भ्रमनिरास झाला. त्या २०० रंगांचा संच मी त्याच्या निकृष्ट दर्जामुळे वापरूच शकले नाही, तो वाया गेला. केवळ दिसायला उत्कृष्ट असणाऱ्या त्या रंगसंचापासून मी काळजीपूर्वक वस्तुखरेदी करण्याचा धडाच घेतला.

## सारांश लेखन

**'आजुनही आठवतात' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

'आजुनही आठवतात' या पाठात लेखक प्र.ई.सोनकांबळे यांनी जीवनातल्या संघर्षमय काळातल्या वेदनादायक आठवणींना उजाळा दिला आहे. आईवडील नसल्याने बहिणीच्या घरी राहून, पडेल ती कामं करून त्यांना जगावे लागले. मॅट्रिकची परीक्षा उदगीरला जाऊन दिल्यानंतरची त्यांची अस्वस्थता, निकालाचा ताण, त्यात दिवसभराचे कष्ट यांचे वर्णन त्यांनी केले आहे. परिस्थितीमुळे लेखकाने पायात कधीच चप्पल घातली नाही. परिणामी, त्यांच्या पायात ५१ काटे घुसलेले होते. ते काढताना त्यांच्या पायाला जखमा झाल्या. मॅट्रिकनंतर महाविद्यालयात जाण्यापूर्वी त्यांनी स्वस्तातली चप्पल घेतली; पण तिचे सुख काही त्यांना लाभले नाही; कारण चपलेचे मसुरी मोळे वर आल्याने आधीच जखमा असलेले त्यांचे पाय दुखावले आणि कॉलेजला अनवाणीच जाण्याची वेळ आली. काटे आणि चपलेने झालेल्या या जखमा लेखकाच्या मनावर कायमच्या व्रण सोडून गेल्या.